| | | |
|---|---|---|
| | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | |

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./४४२६/२०२३** **दिनांक :- १९/०६/२०२३**

**<u>कर्वेरोडवरील पार्किंगबाबतचे प्रसिध्दीपत्रक</u>**

कर्वे रोडवरील सन २०१८ मध्ये मेट्रोच्या कामामुळे खंडोजीबाबा चौक ते करिष्मा चौक दरम्यान असलेले पार्किंगचे आदेश रद्द करुन नो-पार्किंगचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यामुळे सदर परिसरात येणाऱ्या नागरिकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत होती.

सद्या मेट्रोचे काम पूर्ण झाले असल्याने नागरिकांची गैरसोय टाळणेकरीता वाहतूक शाखेकडून यापुर्वी सदर संपूर्ण रोडची पाहणी करण्यात आली असून ज्या ठिकाणी वाहनांकरीता जास्त कॅरेज-वे उपलब्ध होत आहे अशा ठिकाणी नागरिकांच्या सोयीकरीता दुचाकी / चारचाकी वाहने पार्किंग व्यवस्था करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, त्या अनुषंगाने डेक्कन वाहतुक विभागांतर्गत कर्वे रोडवरील पार्किंगसंदर्भात खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**डेक्कन वाहतूक विभागांतर्गत**

**१.रसशाळा चौकाकडून स्वातंत्र्य चौकाकडे जाताना -**

अ) बॅक ऑफ महाराष्ट्र समोर १० मिटर चारचाकी पार्कींग करण्यात येत आहे.

ब) भाग्यश्री ज्वलर्स ते चैतन्य नगरी सोसा.१५ मिटर चारचाकी पार्कींग करण्यात येत आहे.

क) युनियन बॅक ते स्वप्न नगरी सोसा.२० मिटर चारचाकी पार्कींग करण्यात येत आहे.

ड) सिध्देश्वर मेडीकल ते कोहीनूर वॉईन्स पर्यत सोसा.गेट सोडून १५ मिटर दुचाकी पार्कींग करण्यात येत आहे.

इ) गणेश चेंबर,रेबन शोरुम ते अमर हार्ड वेअर पर्यत १५ मिटर दुचाकी पार्कींग करण्यात येत आहे.

**२.स्वातंत्र्य चौक ते रसशाळा चौकाकडे जाताना**

अ) कल्याण ज्वलर्स शेजारील धनश्री ग्लास दुकान ते गो-कलर्स दुकान पर्यत ५ मिटर दुचाकी पार्कींग करण्यात येत आहे.

ब) जगन्नाथ तरटे मार्गा शेजारील ओपन हाऊस,सारथी हॉटेल ते प्राईम फर्निचर शोरुम पर्यत ५० मिटर दुचाकी पार्कींग करण्यात येत आहे.

क) भोडे कॉलनी लेन ते कचरे पथ पर्यत २० मिटर दुचाकी पार्कींग करण्यात येत आहे.